<u>प्रतिवादी क्र.१ चा उलटतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री.व्ही.एस.पाटणे यांचेमार्फत शपथेवर सुरु –</u>

**१७.** हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील मारूती यांचे निधन दि.२४/०४/१९८२ रोजी झाले. हे म्हणणे खरे आहे की,मी शाळेत असताना माझ्या आईचे निधन झाले. हे म्हणणे खरे आहे की, वादी क्र.१ हा हिंदूस्तान लिव्हर, वादी क्र.३ हा जॉन्सन, वादी क्र. ४ हा पोलीस खात्यात व वादी क्र. ५ हा बी.ई.एस.टी मध्ये कामाला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी, सुरेंद्र व राजेंद्र यांना काहिही कामधंदा नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मला एस.टी.तून निलंबित केले होते. हे म्हणणे खरे नाही की, आम्हा प्रतिवादींना काहीही कामधंदा नव्हता व त्याउलट वादी मुंबईत मोठ्या पदावर नोकरी करत होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे विठ्ठल यांच्यावर वादी व प्रतिवादींचे कुटूंब अवलंबून होते. मुंबईमधील खोली भाड्याची होती किंवा कसे ते मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, भाड्याची खोली वाटपास पात्र नसते. हे म्हणणे खरे आहे की, ६३/३ या मिळकतीत कलमे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मिळकत क्र. ६३/३ चे सातबारा उता–यावर विठ्ठलचे नाव होते. हे म्हणणे खरे आहे की, या जमिनीत विठ्ठलच्या नावाने कलमे लावणे आवश्यक होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे दि.१२/०१/१९९० रोजी महाराष्ट्र कृषी विकास बँके कडून विठ्ठलच्या नावाने कर्ज घेतले गेले. हे म्हणणे खरे नाही की, त्यातून वांदींनी मिळकत क्र.६३/३ मध्ये कलमे लावली. हे म्हणणे खरे आहे की, वादी क्र.१ ने दि.१३/०४/२००५ रोजी एक कर्ज फेडले. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, वादी क्र.१ ने शेवटचा हप्ता फेडला. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीतील घर वडीलोपार्जित आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे या घर मिळकतीत वादी व प्रतिवादी असा दोघांचाही हिस्सा आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादींना घराची गरज

नसल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की,१९/८ व ४५/८ मधील प्रत्येक दोन कलमे ही वडीलोपार्जित आहेत. हे म्हणणे खरे नाही की, १८/४ मधील नारळाची झाडे वडीलोपार्जित आहेत.

**१८.** हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकती मूळची गोविंद यांची. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही एकूण रक्कम रू. २५,०००/– रमाकांत वगैरे यांना दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, दोन विहिरी विठ्ठल व शांताबाई यांनी काढल्या. आता मला नि.क्र.१५७/३ कडील पत्र दाखविले. ते पत्र सुरेश याने विठ्ठल यांना लिहीले असे नमुद आहे.

प्रश्न – ते पत्र दि. ५/०४/१९८३ सालाचे आहे ?

उत्तर – पत्र चुकीचे आहे.

**१९.** उलटतपासात पत्र दाखविल्याने त्यास **ओळखीपुरते नि.क्र. ३००** देण्यात येते. हे म्हणणे खरे नाही की, मागील तीन वर्षाचे उत्पन्न मागण्याचा अगर मिळण्याचा वादींना हक्क नसल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादी क्र.१ ते ७ यांचा प्रत्येकी एक चर्तुथांश हिस्सा आहे. दावा मिळकतीतील माझा हिस्सा जो ठरेल तो. किती आहे ते मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, विहिरी आम्ही बांधल्याचे खोटे सांगत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.** **श्रवणोत्तर स्वीकृत**

**सही/–**

**दि. ०७/०८/२०२६** **(अं. आ. कुलकर्णी)**

**स्थळ – रत्नागिरी.** **३ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,**

**रत्नागिरी.**